**वाचा:-** १. शासन निर्णय पा.पु. व स्व.विभाग क्र.३०९९/प्र.क्र.१३/पापु-१४ दि.०१ फेब्रुवारी १९९९
२. उपविभागीय अधिकारी , वसमत यांचा प्रस्ताव दिनांक-१२.०३.२०१८ प्राप्त दि.१५.०३.२०१८

जा.क्र.२०१८/पाट/टँकर/कावी-
**जिल्हाधिकारी कार्यालय हिंगोली**
दिनांक-२० .०३.२०१८

**::आदेश::**

**विषय:-** पाणी टंचाई २०१८ जि. हिंगोली
पाणी टंचाई ग्रस्त गावांना शासकीय टँकरव्दारेपाणी पुरवठा करणे बाबत.

आपणास या आदेशाव्दारे सुचित करण्यात येते की, हिंगोली जिल्हयातील पिण्याच्या पाण्याची तिव्र टंचाईग्रस्त गावांना टॅकरव्दारे पाणी पुरवठा करण्यासाठी आपल्याकडे असलेल्या खाली दर्शविलेल्या क्रंमांकाचे शासकीय टँकरव्दारे त्यांच्या नावासमोरील पाणी टंचाई गावांना पाणी पुरवठा करण्यासाठी आदेशीत करण्यात येत आहे.

| अ. क | टँकर क्रं. | कार्यालयाचे नाव | पाणी टंचाईग्रस्त गावाचे नाव | तालुका | कालावधी | पाणी घ्यावयाचे ठिकाण | करावयाच्या खेपा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | MH ३८ G २८३ | सा.बा. उपविभाग, औंढा ना. | मौ.संघनाईक तांडा | औंढा ना. | दि. .०३.२०१८ ते ३० जुन २०१८ पावेतो | मौजे संघनाईक तांडा येथुन अंतर १० कि.मी. | दररोज १ खेप |

१. सदर क्रंमाकाचे टँकर दिनांक- .०३. २०१८ रोजी संबधीत तहसीलदार व गटविकास अधिकारी,प.स. यांच्या स्वाधीन करुन पाणी टंचाईग्रस्त गावांना सुरक्षीत स्वच्छ पाणी पुरवठा करावा.
२. वाहन चालक यांनी लॉगबुकवर पेंजीग करुन गटविकास अधिकारी यांचेकडुन प्रमाणीत करुन घ्यावे. तसेच लॉगबुक प्रमाणीत न केल्यास ग्राहय धरण्यात येणार नाही. तसेच पाणी पुरवठा करण्याविषयी कोणतीही तक्रार येणार नाही याची प्रामुख्याने दक्षता घ्यावी. पाणी पुरवठा करताना काही अडचणी आल्यास आपण संबधीत तहसीलदार व गटविकास अधिकरी यांच्याशी त्वरीत संपर्क साधावा.
३. संबधीत वाहनाचे लॉगबुक ठेवुन त्यावर ग्रामसेवक आणि तलाठी यानी दररोज स्वाक्षरी करणे बंधनकारक राहील तसेच टँकर खाली करुन लॉगबुकवर दोन महिला सदस्याच्या स्वाक्षरी घेणे बंधनकारक राहील.
४. संबधीत मंडळ अधिकारी व विस्तार अधिकारी यांनी आठवडयामध्ये किमान एक वेळा लॉगबुक तपासुन सही करावी.

स्वा/-
जिल्हाधिकारी हिंगोली

**प्रतिलीपी,**

१. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.हिंगोली यांना माहितीस्तव.
२. उपविभागीय अधिकारी, वसमत यांना माहिती व उचित कार्यवाहीस्तव.
३. कार्यकारी अभियंता,ग्रा.पा.पु.वि.जि.प.हिंगोली यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
४. तहसीलदार, औंढा ना. यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
५. गटविकास अधिकारी, श्रेणी -१, प.स., औंढा ना. यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
६. उपअभियंता, सा.बा. उपविभाग, औंढा ना. यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
७. एनआयसी विभाग जि.अ.कार्यालय हिंगोली यांना पुढील कार्यवाहीस्तव.

20.03.18

जिल्हाधिकारी हिंगोली

d:\shete updated 26.02.2018\pani tanchi 2015\pani tanchai 17\प्रशासकीय मान्यता आदेश\tanker order\tanker order - 2018.doc